# वाळवंटाच्या पलीकडे

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

पर्शियाच्या वाळवंटात कुठेतरी प्रवाशांचा हा तांडा होता. त्यांच्या सभोवती वाळूचा समुद्र होता, ज्याच्या लाटा पाहून असे वाटत होते की, जणूकाही त्या लाटा कोरून त्यांना अल्पकालीन स्थायीपणा प्रदान केला गेला होता. या लाटा पुढे-पुढे सरकत होत्या, संध्याकाळी क्षितिजापर्यंत त्या एकमेकींचा पाठलाग करत होत्या.

त्या समूहाचा मुखिया एक व्यापारी होता, रेशीम आणि सुंदर गालीच्यांचा एक विक्रेता. त्याने आपले सामान व्यवस्थितपणे बांधून ढकलगाड्यांमध्ये ठेवले होते; ज्या ढकलगाड्या त्याने पट्ट्याने उंटांच्या पाठीला बांधलेल्या होत्या आणि आता तो — आपल्या काही शिकाऊ माणसांसोबत — दूरवरच्या आणि अधिक नफा मिळवून देणाऱ्या बाजारांकडे जाण्याकरता निघाला होता. दिवसा ते तंबू बांधून सूर्याच्या उष्णतेपासून स्वतःचा बचाव करत. रात्री ते ताऱ्यांच्या साहाय्याने आपली दिशा ठरवत आणि पुढील यात्रेला निघत.

ते आता त्यांच्या प्रवासाच्या अंतिम टप्प्यावर पोहोचले होते. त्या मार्गदर्शकाने, ज्याला त्यांनी यात्रेच्या आरंभापासून सोबत ठेवला होता, त्यांना आश्वासन दिले होते की, ते सकाळ होईस्तोवर बाजाराच्या ठिकाणी पोहोचतील. समूहाच्या सर्वांत पुढे चालत असणारी ती व्यक्ती म्हणाली, “फक्त माझ्या पाठोपाठ येत राहा आणि लवकरच आपण तिथे पोहोचू.”

हळूहळू त्यांच्या सभोवार अंधार दाटू लागला, आकाशाचा हलकासा निळसर-जांभळ्या रंग बदलून गडद निळ्या रंगात परिवर्तीत होऊ लागला होता. त्यांचा मार्गदर्शक आकाशाकडे एकटक पाहू लागला. इथे वाळवंटात त्याला वाटले की, तो सर्व तारे पाहू शकतो आहे. आणि तो पाहू शकत होता, अनेक नक्षत्रांना आणि आकाशगंगांना, एका चमचमत्या ब्रह्मांडगोलाला जो दूर क्षितिजातून बाहेर पडत असल्यासारखा प्रतीत होत होता.

*आहाहा,* त्याने तृप्ततेने उसासा सोडला. *हे जणू स्वप्नवत आहे.* गाडी हलतडुलत चालत होती. मंद-मंद हवा वाहत होती; त्याला चेहऱ्यावर गारवा जाणवत होता. त्याने विचार केला, *कदाचित मी फक्त थोडावेळ माझ्या डोळ्यांना विश्रांती देऊ शकतो . . .*

त्याने नुकतेच आपले डोळे मिटले होते — किंवा कदाचित त्याने नुसता तसा विचारच केला होता — तेव्हा अचानकच कुणीतरी त्याला हलवून जागे केले.

“महाशय! *महाशय!* जागे व्हा! सकाळ झाली आहे!”

*“हऽऽऽ?”* मार्गदर्शक घाबरत म्हणाला. *“काऽऽऽय?”*

डोळे चोळत तो उठून बसला; उन्हामुळे त्याचे डोळे दिपून जात होते. अजुनही तो निद्रेच्या अंमलाखाली होता आणि जेव्हा त्याने आपली मान वळवली, तेव्हा व्यापारी त्याच्या शेजारी उभा होता. तो मार्गदर्शकाकडे पाहत होता, त्याचा चेहरा चिंताग्रस्त दिसत होता.

“महाशय,” व्यापारी म्हणाला. “कुठे आहे बाजार? आणि आपण कुठे आहोत?”

मार्गदर्शकाने सभोवार आश्चर्याने पाहायला सुरुवात केली. डावीकडे वाळू होती. उजवीकडे वाळू होती. समोर, मागे आणि त्यांच्या चहूबाजूला होती वाळू आणि *फक्त वाळू.*

तो व्यापाऱ्याकडे वळला, त्याचे तोंड आश्चर्याने वासले होते.

“मला माफ करा,” तो हळूच पुटपुटला. “मला . . . मला उमजतच नाही. आकाशात पुन्हा तारे दिसू लागल्याशिवाय मी काही सांगूही शकणार नाही.”

आतापावेतो त्या समूहातील इतर लोकदेखील सभोवती जमा झाले होते. मार्गदर्शकाच्या तोंडून हे शब्द ऐकून सगळ्यांनाच धस्स् झाले.

“काय करणार आता आपण?” एका माणसाने विचारले, त्याचा स्वर निराशाने भरलेला होता.

“हे कसे शक्य आहे?” दुसरा माणूस म्हणाला; त्याच्या स्वरात क्रोध होता.

अशा प्रकारे बोलचाल सुरू असतानाच, तो व्यापारी मात्र शांतपणे उभा होता. तो आपला ओठ चावत होता. हो, मनाने तोदेखील निश्चितच खचलेला होता. होय, तोदेखील चिंताग्रस्त, गोंधळलेला आणि संतापलेला होता.

आणि याचे मुख्य कारण असे होते की, तो कशाचातरी *विचार* करत होता. त्यांच्याजवळ असलेले पाणी जवळजवळ संपत आले होते, कारण त्यांना आशा होती की, ते आज त्यांच्या मुक्कामस्थळी पोहोचतील. त्यावर त्याला उपाय शोधणे आवश्यक होते आणि तेही तत्काळ.

व्यापाऱ्याने आपल्या सभोवार, दूरवर पसरलेल्या नारंगी-सोनेरी वाळूकडे निरखून पाहिले. अधेमधे काही खडक विखुरलेले होते. दूर अंतरावर त्याला हिरव्या रंगाची धूसर आकृती दिसली — कोणत्यातरी जातीचे झाड.

अचानकपणे त्याच्या डोक्यात एक विचार आला.

"ऐका — ऐका लोकहो!" तो म्हणाला. सर्व लोक एकदम गप्प झाले.

"ताबडतोब माझ्या मागोमाग या!" व्यापारी म्हणाला. "आणि गाड्यांमध्ये ठेवलेली फावडी घेऊन या."

व्यापाऱ्याने त्यांना जसे सुचवले, तसेच त्यांनी केले आणि ते त्याच्यामागे वाळूमधून जाऊ लागले. लवकरच ते त्या जागी येऊन पोहोचले, जिथे ते झाड उगवले होते.

ते एक बरेच मोठे झाड होते, रूंदच्या रूंद पसरलेले आणि त्याच्या एका कडेला पानांमधून डोकावत होते लाल रंगाचे एक छोटेसे फुल. ते गुलाबाचे फूल होते.

"हे पाहिलेत का?" तो विजयी स्वरात म्हणाला. "हा गुलाब जर इथे वाढू शकत असेल, तर याचा अर्थ असाच आहे की, इथे जवळपास पाणी आहे. चला, मला एक फावडे द्या आणि तुम्हीपण एक-एक घ्या. आपण तोपर्यंत खोदू या, जोपर्यंत आपल्याला पाणी सापडत नाही."

आणि मग त्यांनी खोदायला सुरुवात केली — आणखी खोदले, थोडे अधिक खोदले. तरीदेखील, आपले फावडे घेऊन ते जमिनीत जितके खोलवर खोदत राहिले, ते जितकी वाळू बाजूला सारत राहिले, त्यांना मात्र दिसत राहिली फक्त *अधिकाधिक* वाळूच.

शेवटी एक मनुष्य धापा टाकत म्हणाला, "हे तर काहीच कामाचे नाही. आपण कित्येक तास खोदतो आहोत, पण इथे कुठेच पाणी नाही."

त्या व्यापाऱ्याने आपल्या खोदकाम काही काळ थांबवले. त्याने आपला घाम पुसला. "इथे जर झाड आहे, तर इथे पाणीदेखील निश्चितच असणार," तो दृढतेने म्हणाला, "केवळ आपले काम सुरू ठेवा. जे करता आहात ते करत राहा."

त्या माणसाला शंका तर आली, पण तरीही तो त्याच्या कामाकडे पुन्हा परत वळला. आणि हे काय, काही क्षणातच — *टण! टण! टण!* त्याचे फावडे कुठल्यातरी कठीण वस्तुवर आदळले.

“हा आवाज कुठुन येतो आहे?” त्या माणसाने मोठ्या आवाजात आश्चर्य व्यक्त केले. त्याने वाळू बाजूला सारायला सुरुवात केली. इतर लोक वरून पाहात होते आणि लवकरच त्यांना एक प्रचंड दगडी शिळा दिसू लागली.

हे पाहून त्या मनुष्याने स्वतःला वाळूवर झोकून दिले.

“काय करायचे आता आपण?” तो निराशेने कळवळला. “इतकी सर्व मेहनत व्यर्थ गेली तर!”

“तुला काय म्हणायचे आहे?” व्यापाऱ्याने विचारले. “आपण काम सुरूच ठेवणार.”

“पण, हा खडक!” तो मनुष्य शंकापूर्ण स्वरात म्हणाला.

“यामुळे आपण आपले काम का थांबवायचे?” त्या व्यापाऱ्याने विचारले.

तो मनुष्य अवाक् झाला. “आपण हा खडक कसा तोडणार आहोत?” त्याने विचारले. “ही फावडी काही उपयोगाची नाहीत.”

“आपल्याकडे इतर अवजारे आहेत,” व्यापारी म्हणाला. “जा, तुम्ही सर्वजण गाडीतून लोखंडी घण घेऊन या.”

मग ते सर्वजण लोखंडी घण आणण्यासाठी गेले. ते परत आल्यावर व्यापारी म्हणाला, “आता तुमच्या बळाचा उपयोग करा. तुमच्या सर्व हिंमतीचा आणि निश्चयाच्या बळाचा वापर करा. या खडकावर प्रहार करून तोडून टाका त्याला.”

त्या माणसांनी लोखंडी घण आपल्या हातात घट्ट पकडले आणि हात वर उंचावले. त्यांनी एकत्रितपणे खडकावर घणाने प्रहार केले.

*धममम्.* कानठळ्या बसवणारा आवाज होता. पुन्हा एकदा त्यांनी आपल्या हातांनी घण उचलले आणि त्यांना खडकावर आदळले. *धममम्.*

आणि लवकरच त्या खडकाला भेगा पडल्या. आणि त्या भेगांमधून लगेच थोडेसे पाणी झिरपताना दिसू लागले. व्यापारी आणि त्याच्या समूहातले लोक खूश झाले आणि त्यांनी आनंदाने नाचायला-गायला सुरुवात केली. ते मुक्कामाच्या अगदी जवळ पोहोचले होते; अंतिम लक्ष्य त्यांच्या दृष्टीपथात होते! ते जोरजोरात लोखंडी घण मारत राहिले, त्याचवेळी —

घणाच्या एका शेवटच्या जोरदार प्रहाराने — धातुची संघटितपणे खनिज पदार्थावर आपटण्याची एक कानठळ्या बसवणारी अंतिम गर्जना — आणि खडक तुटला. त्याचे दोन तुकडे झाले. वर, वर, वर, पाणी उसळी मारून वर आले. दबलेली शक्ती शेवटी बाहेर आली.

*होय,* आकाशाच्या दिशेने खूप उंच उसळणाऱ्या पाण्याकडे पाहत व्यापाऱ्याने विचार केला.

*होय,* त्याने त्याच्या वरच्या बाजूला पाण्याच्या तुषारांपासून बनलेल्या धनुष्याकारातील कमानी पाहून विचार केला. त्या सूर्यप्रकाशात स्फटीकासमान चमकत होत्या.

*आपली तहान नक्कीच भागेल,* त्याने विचार केला. *आणि आता — आता — आता आपण वाळवंटाच्या पलीकडे जाऊ.*

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन® . सर्वाधिकार सुरक्षित.

ही कथा एका जातक कथेने प्रेरित आहे जी भगवान बुद्धाच्या विभिन्न अवतारांविषयीच्या लघु कथांचे व किश्श्यांचे संकलन आहे.